महाराष्ट्र वन विभाग

# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांचे कार्यालय

(बीएसएनएल "संचार लक्ष्मी" इमारत,कस्तुरचंद पार्क समोर, नागपूर-४४० ००१, दुरध्वनी क्रमांक ०५-७१२-२५६४ ५६१)
Email id :-ccftnagpur@mahaforest.gov.in

जा.क्रमांक कक्ष-१/आस्था/अ/प्र.क्र.९६(२०१७.१८)/ ३९०

नागपूर - दिनांक ०४/०५/२०१८

## जाहिरात

**शासकिय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेण्याबाबत.**

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेंबर, २०१६ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांचे अधिनस्थ विवक्षित कामासाठी करार पध्दतीने सेवा प्राप्त करण्यासाठी नामिकासूची (पॅनेल) तयार करण्याकरीता खालील तपशिलानुसार अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | विवक्षित कामांचे स्वरूप | सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचा दर्जा व संख्या | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ५० कोटी वृक्ष लागवडीचे सनियंत्रण | सहाय्यक वनसंरक्षक- ४ ( नागपूर-१, वर्धा-१, भंडारा-१, गोंदिया-१ ) | २ वर्ष |

२.०० वरिल तक्त्यातील अ.क्र. १ चे अनुषंगाने अर्ज करणाऱ्या सेवा निवृत्त अधिकाऱ्यांकडे मागील २ वर्षापासून अंमलात आणलेल्या २ कोटी व ४ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

३.०० प्राप्त अर्जापैकी पात्र अर्जदाराकडून वरिल तक्त्यात दर्शविलेल्या संख्यांप्रमाणे नामिका सूची तयार करण्यात येईल व आवश्यकतेनुसार सेवा प्राप्त करण्यात येईल. अर्जदारास नागपूर, गोंदिया, भंडारा व वर्धा या जिल्हयांपैकी कोणत्याही जिल्हयात राहून सेवा प्रदान करावी लागेल.

४.०० या संदर्भात शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेंबर, २०१६ मधील अटी व शर्ती लागू राहतील. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संगणक संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१६१२१७१७१८२४१३०७ असा आहे.

५.०० नेमणूक केलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना उपरोक्त शासन निर्णयातील ड (१)(क) मध्ये विहीत केल्याप्रमाणे मासिक पारिश्रमिक अनुज्ञेय राहील.

६.०० अर्जाचा नमुना मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांचे कार्यालयाचे संकेतस्थळ www.mahaforest.gov.in यावर उपलब्ध आहे.

७.०० अर्जाचा नमुना सोबत दिल्याप्रमाणे असून अर्जदारांनी त्यांचे अर्ज खालील कार्यालयीन पत्त्यावर टपालाने दिनांक १५/०५/२०१८ पर्यत पाठवावे.

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर
बीएसएनएल "संचार लक्ष्मी" इमारत,
कस्तुरचंद पार्क समोर,
नागपूर-४४० ००१

४/५/२०१८

मुख्य वनसंरक्षक
(प्रादेशिक), नागपूर.

# (अर्जाचा नमुना)

जाहिरात क्रमांक :- कक्ष-१/आस्था/अ/प्र.क्र.९६(२०१७.१८)/३९० , दिनांक :- ०४/०५/२०१८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अर्जदाराचे पूर्ण नाव | :- | |
| २ | जन्म दिनांक | :- | |
| ३ | अर्जदाराचा भ्रमणध्वनी क्रमांक | :- | |
| ४ | अर्जदाराचा पत्ता | :- | |
| ५ | अर्जदाराचा ई-मेल | :- | |
| ६ | सेवानिवृत्तीचा दिनांक | :- | |
| ७ | सेवा निवृत्तीच्यावेळी धारण केलेले पद | :- | |
| ८ | सेवानिवृत्तीच्या वेळी वेतन श्रेणी | :- | |
| ९ | सेवा तपशील<br>(सेवेत लागल्यापासून सेवानिवृत्त होईपर्यंतचा सेवातपशील नमूद करावा) | :- | |

## प्रमाणपत्र

मी याद्वारे प्रमाणित करतो की, सदर अर्ज सादर करतेवेळी माझे विरुध्द कोणतीही शिस्तभंग विषयक कार्यवाही किंवा फौजदारी खटला सूरू अथवा प्रलंबित नाही तसेच वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा असून त्यात तफावत आढळल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहीन.

दिनांक :-　　　　　　　　　　　　　　　　　　पूर्ण नाव व स्वाक्षरी

स्थळ :-